


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : १५३ वा शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# एक टेकाळे जाळ्यात, दुसरा आरोप सिद्ध होऊनही मात्र मोकाट...

## बेकायदेशीर संपत्ती उघड होऊनही विजय टेकाळेंवर एसीबीची मेहेरनजर कशासाठी?

**बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे हे कित्येक वर्षांपासून बुलडाणा मुख्यालय मंडळ अधिकारी म्हणून एकाच ठिकाणी खुर्चीला चिटकून बसले होते. नियमबाह्य केलेल्या कामांचा पाठपुरावा केला असता त्यांची उचलबांगडी होऊन त्यांना मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम येथे पाठविण्यात आले असून त्यांनी केलेल्या भ्रष्टाचार प्रकरणात जो पर्यंत कारवाई होत नाही आमचा पाठपुरावा असाच सुरू राहील**



लाच स्विकारताना रंगेहात पकडलेला अधिकारी गजानन टेकाळे




जनसंचलन/बुलढाणा

पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे यांना दोन दिवसांपूर्वी लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अक्षरशः रंगेहात पकडले. पुरवठा विभागात काम करताना शासनाचा पगार घ्यायचा आणि लोकांची लुबाडणूक करून त्यांच्याकडून पैसे उकळण्याचे टेकाळेंचे प्रताप यानिमित्ताने उघड झाले. परंतु गजानन टेकाळे यांच्याच गावचे असलेले महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनीही सरकारी नोकरीत राहून भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम प्रस्थापित केलेले आहेत. त्यांच्या भ्रष्टाचाराचे पुरावे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. मग विजय टेकाळेंवर कारवाई करण्यात एसीबीचे अधिकारी चालढकल का करीत आहेत, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. महसूल विभागात काम करीत असताना विजय दत्तात्रय टेकाळे यांनी गेल्या अनेक वर्षांत प्रचंड बेशरमपणे आणि बेदरकारपणे भ्रष्टाचार केलेला आहे. त्यांनी हा भ्रष्टाचार करताना ते ज्या शासनाचा पगार खात होते, त्या शासनाच्या महसुलाला देखील चुना लावण्यात त्यांना कसलीही लाज-शरम वाटली नाही.एकीकडे जनतेसाठी काम करणारा शासनाचा प्रतिनिधी म्हणून काम करायचे आणि दुसरीकडे जनतेचीच लुबाडणूक करून आपल्या तुंबड्या भरायचा, हा प्रकार टेकाळेंनी वर्षानुवर्षे केला. चुकीचे सातबारे तयार करून अनेकांच्या जमिनीत घोटाळे केले,फेरफारमध्ये नाना गैरप्रकार केले, आपल्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधिकारांचेही हनन केले, प्रसंगी न्यायालयाच्या आदेशांनाही हरताळ फासला. तुकडेबंदी कायदा असो की जमीन महसूल अधिनियम असो, या सर्वांचा त्यांनी अगदी उघडपणे भंग केला. प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करून स्वतःच्या व जवळच्या नातेवाईकांच्या नावे प्रचंड प्रमाणात बेकायदेशीर व बेनामी संपत्ती गोळा केली. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या हाती आज टेकाळे व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावे असलेले शेकडो सातबारे लागलेले आहेत. टेकाळेंच्या सर्व पापांची माहिती दैनिक जनसंचलन वसिटी न्यूज एकीकडे आपल्या वृत्तमालिकेतून प्रकाशित करीत आहे, तर दुसरीकडे ही माहिती महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही देण्यात आली. एव्हढेच नाही तर टेकाळे व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावे असलेले सातबारा उतारे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे अनेक महिन्यांपूर्वीच दिलेले आहेत. शिवाय एसीबीच्या अधिकाऱ्यांना भेटून टेकाळेंच्या बेकायदेशीर संपत्तीची चौकशी करून ती जप्त करण्यासंदर्भात उचित कारवाई करावी, अशी मागणी देखील केली. या तक्रारीवर व माहितीवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून नाही म्हणायला थातूरमातूर कागदी कारवाई करण्यात आली. परंतु टेकाळेंची बेनामी व बेकायदेशीर संपत्ती जप्त करून व पुढे त्यांच्यावर कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात काहीही कारवाई आजवर झालेली नाही. छोटा मासा पकडायचा आणि मोठा मासा सोडून द्यायचा,असा खाक्या तर एसीबीच्या अधिकाऱ्यांचा नाही ना, अशी शंका या घटनेमुळे येऊ लागली आहे. उघडपणे विजय दत्तात्रय टेकाळे यांच्याविरोधात पुरावे असून देखील त्यांच्यावर कारवाई करण्यात महसूल विभागाचे अधिकारी तर कुचराई करीतच आहेत, परंतु लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची अशी कोणती मजबुरी आहे की तेही कोणतीही कारवाई न करून टेकाळेंना एकप्रकारे अभय देण्याचे काम करीत आहेत. विशेष गंभीर बाब म्हणजे जेंव्हा विजय टेकाळे यांची विभागीय चौकशी सुरू होती, त्या वेळी त्यांनी आपला भ्रष्टाचार लपवण्यासाठी स्वतःच्या नावे असलेल्या जमिनीचे अनेक सातबारा उतारे दुसऱ्यांच्या नावे केले होते. एव्हढा उघड भ्रष्टाचार होऊनही आजही महाभ्रष्टाचारी अधिकारी ताठ मानेने महसूल विभागात बसून महसूल विभागाला वाळवीसारखा पोखरत आहे. लाच घेताना एक टेकाळे तर एसीबीच्या जाळ्यात अडकला, परंतु दुसरा टेकाळे यापेक्षाही प्रचंड प्रमाणात मोठा भ्रष्टाचार करून देखील आजही राजरोसपणे सरकारी नोकरीत कार्यरत आहे. या महाभ्रष्टाचारी टेकाळेला पकडण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी आता कोणत्या मुहुर्ताची वाट पाहत आहेत की या विभागाच्या अधिकाऱ्यांनी टेकाळेंशी काही अर्थपूर्ण साटेलोटे केले आहे का, हेही उघड होणे गरजेचे आहे. येत्या काही दिवसांमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी थोडी तत्परता दाखवावी व विजय टेकाळे यांच्या बेकायदेशीर शेकडो सातबाऱ्यांसंदर्भात योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा या निमित्ताने आम्ही व्यक्त करीत आहेत. तसेही जोपर्यंत विजय टेकाळेंसारख्या महाभ्रष्टाचाऱ्याला तुरुंगात पाठवले जात नाही, तोपर्यंत ही मोहीम अशीच अविरतपणे सुरू राहणार आहे.

# वनकर्मचारी, पोलिसांवर हल्ला; २६ जणांवर गुन्हे दाखल...

## कोयत्याने पोलिसावर हल्ला; सहा जणास अटक



जनसंचलन/मोताळा

राजूर वर्तुळातील माळेगाव (ता. मोताळा) येथील वनजमिनीवरील अतिक्रमण हटविण्यास गेलेल्या वनविभागाच्या अधिकाऱ्यांवर पोलिसांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी बोराखेडी पोलिस ठाण्यात २६ व जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहा जणांना अटक करण्यात आली असून, यातील तिघांना न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. २३ जुलै रोजी सकाळी ९ वाजता वनविभागाचे ७ अधिकारी, ८६ कर्मचारी, १२ वनमजूर, तसेच १०० पेक्षा अधिक पोलिस बंदोबस्तासह माळेगाव येथे गेले होते. दुपारी ३ वाजेपर्यंत अतिक्रमण काढण्यासाठी वेळ देण्यात आली होती. मात्र, कारवाई सुरू होताच हा हल्ला झाला. या घटनेत पोलिस नाईक राजेश मानकर यांच्यावर संजय तुळशीराम पिंपळे याने कोयत्याने डोक्यावर गंभीर वार केला. इतर वनकर्मचारी व पोलिस जखमी झाले. आरोपींनी आरपीएफचे वाहन, वनविभागाचे वाहन, रुग्णवाहिका व तीन जेसीबी अशा नऊ वाहनांची तोडफोड केली. अंदाजे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले. पोलिस नाईक - प्रवीण पडोळ यांनी तक्रार दिली आहे.

# ...शब्दांचा अडसर नाही...

## संपादकीय लेख

आपली राज्यघटना ज्या मूलभूत मूल्यप्रणालीवर आधारलेली आहे त्याची व आपली उद्दिष्टे यांची ओळख राज्यघटनेची प्रस्तावना करून देते. प्रस्तावनेतील उद्दिष्टे म्हणजे घटनेचा मूलभूत गाभा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी म्हटलेले आहे. ज्येष्ठ विधिज्ञ नानी पालखीवाला यांनी, ङ्गप्रस्तावना हे घटनेचे ओळखपत्र आहे,फ असे म्हटले होते. बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीनुसार घटनेच्या प्रस्तावनेत समाविष्ट केलेले ङ्गसमाजवादीफ व ङ्गधर्मनिरपेक्षफ हे शब्द प्रस्तावनेतून काढून टाकावेत, अशी मागणी आता केली जात आहे. या पार्श्वभूमीवर मुळात प्रस्तावनेत असे बदल करता येतात का याबाबत व या दोन शब्दांबाबत सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी काय भाष्य केले आहे आहे हे पाहणे उद्बोधक ठरेल. राष्ट्रपतींनी घटनेच्या कलम १४३अन्वये बेरुबारी युनियन अँड एक्सचेंज ऑफ एन्क्लेव्हज या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडे मागितलेल्या सल्ला प्रकरणात न्यायालयाने, प्रस्तावना ही घटनाकारांना काय अभिप्रेत होते हे सूचित करत असली तरी ती घटनेचा भाग नाही व ती विधान मंडळाला कोणतेही आधिकार बहाल करत नाही, हे अधिकार घटनेतील अन्य तरतुदींद्वारे मिळतात, असे म्हटले आहे. पुढे सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती निकालात असे म्हटले की, बेरुबारी प्रकरणात न्यायालयाच्या ही गोष्ट लक्षात आली नाही, की प्रस्तावनेवर घटना समितीत तपशीलवार चर्चा झाली होती आणि प्रस्तावनेला समितीची अतिम संमती घेताना ङ्गप्रस्तावना ही घटनेचा भाग आहेफ असे म्हटले होते. त्यामुळे प्रस्तावनेत घटनेच्या कलम ३६८नुसार बदल करता येईल; पण त्या बदलामुळे घटनेचा जो मूळ गाभा आहे त्यात बदल होता कामा नये. एस. आर. बोम्मई विरुद्ध भारत सरकार या याचिकेच्या निकालात, प्रस्तावना ही घटनेचा अविभाज्य भाग आहे असे म्हटले आहे. सेक्युलॅरिझम ह्या शब्दाचा स्वीकृत अर्थ असा की राज्याचा (स्टेट) कुठचाही धर्म नाही. ते सर्व धर्मांकडे तटस्थपणे पाहते. बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीच्या आधीपासूनच हा अर्थ घटनेत अनुस्यूत होता. घटनेच्या प्रस्तावनेतच विश्वास, श्रद्धा व आराधनेच्या स्वातंत्र्याचा उल्लेख आहे व घटनेतील कलमे (अनुच्छेद) २५ ते २८ नागरिकांना ही धार्मिक स्वातंत्र्ये बहाल करतात. सामंथा विरुद्ध आंध्र प्रदेश सरकार या याचिकेच्या १९९७मधील निकालात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, प्रस्तावनेतील समाजवादी शब्दाचा अर्थ हा उत्पन्न आणि दर्जामधील असमानता कमी करणे, संधी आणि सुविधांची समानता प्रदान करणे ही जी कलमे १४, १५, १६, १७, २१, २३, ३८, ३९, ४६ इत्यादींची उद्दिष्टे आहेत त्यांच्या संदर्भात लावावयास हवा. सामाजिक न्यायाच्या तत्त्वानुसार आर्थिक विषमता दूर करणे, गरिबांना चांगले राहणीमान पुरवणे, आणि समाजातील दुर्बल घटकांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे, जेणेकरून समाजातील सर्व घटकांना धर्मनिरपेक्ष एकात्मिक समाजवादी भारतात सन्मानाने आणि समान दर्जा देऊन सामावून घेता येईल, हा तो अर्थ आहे. वरील निकालात उल्लेखिलेली कलमे ही अनुक्रमे कायद्यापुढे सर्व समान व सर्वांना कायद्याचे समान संरक्षण, धर्म, वंश, जात यावर आधारित भेदभावाला प्रतिबंध, सार्वजनिक रोजगारात समान संधी, अस्पृश्यता निवारण, ैयक्तिक स्वातंत्र्य व जीवनाचा हक्क, मानवी तस्करी व वेठबिगारीला प्रतिबंध, कल्याणकारी समाजव्यवस्था, मार्गदर्शक तत्वे, अनुसूचित जाती जमाती व अन्य दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न ह्या विषयीची आहेत. डी. एस. नकारा आणि इतर विरुद्ध भारत सरकार ह्या प्रकरणात घटनापीठाने असे म्हटले आहे की, समाजवादी प्रजासत्ताकाची संकल्पना म्हणजे गरिबी, अज्ञान, रोगराई आणि संधीची असमानता संपविण्यासाठी सामाजिक-आर्थिक बदल करणे ही आहे. समाजवाद ह्या शब्दाबद्दल बराच गैरसमज आहे. वेळोवेळची मूल्ये ही समकालीन समाजवादाची दिशा ठरवतात. समाजवादी राज्याचे मुख्य उद्दिष्ट उत्पन्न, दर्जा आणि जीवनमानातील असमानता दूर करणे हे आहे. कष्टकरी लोकांना आयुष्यभर एक सभ्य जीवनमान व सुरक्षा प्रदान करणे. वंचित व्यक्तीला एक सभ्य किमान जीवनमानाची शाश्वती दिली जाणे आणि कोणत्याही स्वरूपातील शोषणास प्रतिबंध करणे हा समाजवादाचा अर्थ आहे. हे दोन शब्द प्रस्तावनेतून काढून टाकावेत ह्या विनंतीसाठी केलेली डॉ. बलराम सिंह व भारत सरकार ही रिट याचिका नोव्हेंबर २०२४मध्ये फ ेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे, की २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले गेले यामुळे काही फरक पडत नाही. पूर्वलक्ष्यी प्रभावाचा युक्तिवाद जर स्वीकारला गेला तर, संविधानाच्या कोणत्याही भागात केलेल्या सुधारणांना तो लागू होईल. संविधान सभेने प्रस्तावनेत ङ्गसमाजवादीफ आणि ङ्गधर्मनिरपेक्षफ हे शब्द समाविष्ट करण्यास सहमती दर्शविली नव्हती, हे खरे असले तरी, राज्यघटना हा एक जिवंत दस्तऐवज आहे. कालौघात भारताने धर्मनिरपेक्षतेची स्वतःची व्याख्या विकसित केली आहे, जिथे राज्य कोणत्याही धर्माचे समर्थन करत नाही किंवा कोणत्याही श्रद्धेच्या व्यवसाय आणि प्रथांना दंडित करत नाही. फ्धार्मिक आधारावर नागरिकांमध्ये भेदभाव न करणे व सार्वजनिक रोजगारात कायद्यांचे समान संरक्षण आणि समान संधीची हमी देणे यासाठी घटनेत तरतुदी आहेत. या तरतुदी असूनही मार्गदर्शक तत्त्वांत समान नागरी कायद्यासाठी प्रयत्न याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे, भारतीय संदर्भात ङ्गसमाजवादफ या शब्दाचा अर्थ निवडून आलेल्या सरकारच्या आर्थिक धोरणांवर बंधने घालणारा म्हणून लावता कामा नये. बेचाळीसावी घटना दुरुस्ती आणीबाणीच्या काळात लागू झाल्यामुळे आणि लोकसभेचा कालावधी वाढल्यामुळे ती रद्द करावी, असा प्रस्ताव संसदेत पंचेचाळीसावी घटना दुरुस्तीच्यावेळी विचाराधीन होता. या चर्चे दरम्यान, ङ्गधर्मनिरपेक्षफ आणि ङ्गसमाजवादीफ या शब्दांचा समावेश चर्चेत आला होता. त्यानंतर, या विधेयकाचे नाव बदलण्यात आले आणि त्याला चव्वेचाळीसावी घटना दुरुस्ती १९७८ असे नाव देण्यात आले. ङ्गधर्मनिरपेक्षफ हा शब्द सर्व धर्मांसाठी समान आदर राखणारे प्रजासत्ताक दर्शवितो, असे स्पष्ट करण्यात आले, तर ङ्गसमाजवादीफ हा शब्द सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक सर्व प्रकारच्या शोषणाचे उच्चाटन करण्यासाठी समर्पित प्रजासत्ताक दर्शवतो, असे म्हटले गेले. तथापि, ही दुरुस्ती राज्यसभेने स्वीकारली नाही. स्वातंत्र्यप्राप्तीस शंभर वर्षे पूर्ण होण्याच्या वर्षात विकसित भारत निर्माण करण्याचे उद्दिष्ट सफल करायचे असेल तर लोकप्रतिनिधींनी व घटनात्मक पदांवरील व्यक्तींनी केवळ विकास या गोष्टीवर लक्ष केंद्रित करावयास हवे. त्याकरता घटनेच्या प्रस्तावनेत काय शब्द असावा किंवा नसावा, यासारखे वाद टाळले पाहिजेत.

## डाक विभागात एजंटसाठी अर्ज मागविले; १२ ऑगस्टला उपस्थित राहण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील टपाल जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्ता व क्षेत्र अधिकारी यांची नेमणूक करण्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रासह दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे. थेट अभिकर्तासाठी अर्जाचा नमुना बुलडाणा प्रधान डाक घर किंवा डाक अधीक्षक बुलडाणा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. एजंट भरतीसाठी उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान दहावी पास असावी. बेरोजगारीत किंवा स्वयंम रोजगारीत शिक्षित युवा, माजी जीवन सल्लागार, इन्शुरन्स कंपनीचे माजी एजंट, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका, महिला मंडळ सेविका, सेवानिवृत्त शिक्षक व इतर अर्ज करू शकतील. उमेदवाराची निवड थेट मुलाखतीद्वारे व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्व, परस्पर संबंधाचे कौशल्य, जीवन विम्याबाबत ज्ञानाच्या आधारावर केली जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रूपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल. सदर रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र अथवा कृषी विकास पत्राच्या स्वरुपात राहणार आहे. प्रशिक्षण पूर्ततेनंतर डाक विभागाकडून तात्पुरता परवाना देण्यात येईल. हा परवाना आयआरडीएची परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायमच्या परवान्यामध्ये रुपांतरीत केल्या जाणार आहे. ही परवाना परीक्षा नियुक्तीनंतर ३ वर्षाच्या आत पास करणे अनिवार्य राहिल. निवड झालेल्या उमेदवारास ठरविलेले कमिशन दिले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी अधीक्षक, डाक घर कार्यालय, बुलडाणा ४४३००१ येथे विहित नमुन्यातील अर्ज आणि दहावी किंवा बारावी बोर्डाचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, संगणक ज्ञानाचे प्रमाणपत्र, यासह सर्व शैक्षणिक प्रमाणपत्र, तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य संबंधित दस्ताऐवजासोबत दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी ११ ते २ वाजेदरम्यान उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी जवळच्या डाक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे डाकघर अधीक्षक यांनी कळविले आहे.

## शनिवारी कारगिल विजय दिवस उपस्थित राहण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

कारगिल विजय दिवस दि. २६ जुलै २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक व माजी सैनिक विधवा पत्नी, वीरपत्नी, वीरपिता, वीरमाता यांनी शहिद जवान युद्ध स्मारक, बस स्टँडच्या पाठीमागे सकाळी ८ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन शहिद जवान युद्धस्मारक समिती व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# धनंजय मुंडे यांना हायकोर्टाचा मोठा दिलासा, याचिकाकर्त्यांनाच १ लाखांचा दंड...



**बीड :** तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेती पूरक साहित्य खरेदीसाठी राबवलेल्या विशेष कृती आराखड्यांतर्गत कृषी साहित्याच्या थेट खरेदी आणि वितरणाच्या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवले आहे. न्यायालयाने यास विरोध करणाऱ्या दोन्ही याचिका फेटाळल्या आहेत. न्यायमूर्ती आलोक आराधे आणि संदीप व्ही. मर्णे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. तत्कालीन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या भोवती या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात आरोपांची राळ उठवून व्यावसायिक दृष्टिकोन ठेऊन चुकीचे आरोप करण्यात आले होते. मात्र धनंजय मुंडे यांनी राज्य मंत्रिमंडळाची रीतसर मान्यता घेऊनच शेतकऱ्यांच्या हितासाठी हा धोरणात्मक निर्णय घेऊन सदर प्रक्रिया राबवली, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.राज्य शासनाने १२ मार्च २०२४ ला काढलेल्या शासन निर्णयानुसार, बॅटरीवर चालणारे स्प्रेयर, नॅनो युरिया, नॅनो डीएपी, मेटाल्डिहाईड कीटकनाशक आणि कापूस साठवणीसाठी बॅग्स यांसारख्या पाच वस्तू शेतकऱ्यांना थेट खरेदी करून महाराष्ट्र अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन () आणि महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कॉर्पोरेशन () यांच्यामार्फत पुरवण्याचे नियोजन करण्यात आले होते. या निर्णयावरून धनंजय मुंडे यांच्या नावाने घोटाळा हा शब्द वापरून अनेकांनी मुंडेंची आणि कृषी विभागाची बदनामी केली होती. या निर्णयाला विरोध करताना आणि उमेश भोळे यांच्यासह तीन शेतकऱ्यांनी स्वतंत्र याचिका आणि जनहित याचिका दाखल करून या वस्तूंना थेट लाभ हस्तांतरण () योजनेतून वगळण्यास विरोध दर्शवला होता.राज्य शासनाने आपली बाजू मांडताना स्पष्ट केले की, २०१६ मधील योजना व २०२३-२४ मधील विशेष कृती आराखडा ही दोन्ही योजना स्वतः च्या स्वरूपात वेगळी असून त्यांची उद्दिष्टे ही केवळ शेतकऱ्यांचे हीत एवढेच आहेत. विशेष कृती आराखड्याचा उद्देश शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदत नव्हे, तर पीक उत्पादन, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके यांचा समावेश असलेले सर्वांगीण पाठबळ देणे हा आहे आणि तो पूर्णपणे योग्य आहे.

शासनातर्फे अ‍ॅड. अंतुरकर, अ‍ॅड. व्यंकटेश दौंड, अ‍ॅड. कुंभकोनी यांनी बाजू मांडली.न्यायालयाने नमूद केले की योजना आणि विशेष कृती आराखडा यांचा एकमेकांशी संबंध नाही. शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले असून त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही. लेखी याचिका ३२६०/२०२४ फेटाळताना न्यायालयाने स्पष्ट केले की, याचिकाकर्ते केवळ आपल्या व्यवसायाच्या हितासाठी न्यायालयात आले आहेत. तसेच या प्रकरणाचा वापर करून अनेकांनी शासनाच्या तत्कालीन धोरणावर चुकीचे भाष्य करून बदनामी साध्य केली. क्र. २५/२०२५ हीसुद्धा न्यायालयाने ङ्गङ्खखाजगी व्यावसायिक हेतूफ्र असल्याचे म्हणत फेटाळली आहे. विशेषतः याचिकाकर्ते तुषार पाडगिलवार यांनी न्यायालयीन प्रक्रियांचा गैरवापर करत ङ्गङ्खफोरम शॉपिंगङ्खङ्ख केल्याबद्दल १ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला. हा दंड ४ आठवड्यांत हायकोर्ट विधी सेवा प्राधिकरणाकडे भरावा लागेल; अन्यथा संबंधित जिल्हाधिकाऱ्याद्वारे भूमिकराप्रमाणे वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत.

# गिरीश महाजनांच्या अश्लील गोष्टी असल्याचं लोढाने सांगितलं म्हणून भेट, खडसेंचा मोठा गौप्यस्फोट

**जळगाव :** मंत्री गिरीश महाजन आणि एकनाथ खडसे यांच्यात प्रफुल्ल लोढाच्या प्रकरणावरुन वाक्युद्ध रंगले आहे. गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसे यांचा प्रफुल्ल लोढासोबतचा फोटो एक्सवर शेअर करत खळबळ उडवली. महाजन फोटो शेअर करत म्हणाले की, तुमच्या या ङ्गङ्खगुलाबी गप्पाङ्खङ्ख कोणासोबत रंगल्या आहेत? ये रिश्ता क्या कहलाता है?. या फोटोमध्ये प्रफुल्ल लोढा कथितपणे एकनाथ खडसेंना गुलाबी फुलांचा बुके देताना दिसत आहेत. यावर आता एकनाथ खडसेंनीही महाजनांना प्रत्युत्तर दिले आहे. लोढाने मला मंत्री गिरीश महाजन आणि रामेश्वर नाईकांच्या गुलाबी गुलाबी गोष्टी सांगितल्या, असा खळबळजनक दावा खडसेंनी केला. एकनाथ खडसे म्हणाले, प्रफुल्ल लोढाकडे महाजन आणि रामेश्वर नाईक यांच्या अश्लील गोष्टी असल्याचे त्यावेळी प्रफुल्ल लोढा यांनी सांगितले होते, म्हणून आमची ती भेट होती. प्रफुल्ल लोढा आणि मी एकाच गाडीमध्ये प्रवास केला त्यामुळे आमच्या गप्पा झाल्या. प्रफुल्ल लोढा यांनी मंत्री गिरीश महाजन आणि रामेश्वर नाईक यांची सीडी माझ्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले होते. तर महाजनांनी तीन महिने मुंबईच्या हॉटेलात लोढाचे पाय चेपले होते. खडसेंच्या या दाव्यामुळे आता राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत.गिरीश महाजनांच्या





ट्विटवर प्रहार करत खडसे म्हणाले, महाजनांनी जो फोटो ट्विट केला, बोलका फोटो नाही, बोलका फोटो ट्विट करा जे मी केलं, तेव्हा केलेले आरोप हे प्रफुल्ल लोढांचेच आरोप आहेत, असे खडसे म्हणाले.जोपर्यंत मी मंत्रीमंडळात होतो तोपर्यंत गिरीश महाजनांना मंत्रीमंडळात स्थान नव्हतं, त्यामुळे ते षडयंत्र करत आहेत. काय केलं महाजनांनी पक्षासाठी? भाजप आता भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात स्थान देत आहेत. पण जे भाजपसाठी झुंजले त्यांना पक्षात स्थान नाही, अशी टीकाही खडसेंनी केली. तर मी तुमच्यासारखं मुख्यमंत्र्यांच्या मागे फिरत नाही कुठेही लोटांगण घालत नाही. देवा भाऊचे पाय मी चाटत नाही असेही खडसे म्हणाले. तसेच भाजपातून गिरीश महाजन यांच्या वादामुळं मला बाहेर जावं लागलं असा दावाही खडसेंनी केला आहे.

# अंशुलने पदार्पण गाजवलं; इंग्लंडला दिला न विसरणारा धक्का...

**मँचेस्टर:** भारतीय क्रिकेट संघ ५ सामन्यांच्या मालिकेतील चौथ्या सामन्यात इंग्लंडचा सामना करत आहे. हा सामना मँचेस्टरमध्ये रंगत असून या सामन्याचे नाणेफेक इंग्लंडने जिंकले. या सामन्यात टीम इंडिया पहिल्या डावात ३५८ धावांवर ऑल आऊट झाली. प्रत्युत्तरादाखल इंग्लंडच्या सलामीवीरांनी टीम इंडियाच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. विशेषतः बेन डकेटने टीम इंडियाच्या गोलंदाजांविरुद्ध खूप धावा केल्या. डकेट त्याच्या चौथ्या कसोटीकडे वाटचाल करत असताना अंशुल कंबोजने त्याला माघारी पाठवले.अंशुल कंबोजला अखेर त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले. त्याने सेट फलंदाज बेन डकेटला बाद केले. या सामन्यात डकेटने ९४ धावा केल्या होत्या. त्याने १०० चेंडूत १३ चौकार मारले होते आणि तो वेगवान खेळी खेळत होता. पण नंतर अंशुलने त्याला शॉर्ट पिच बॉलवर ध्रुव जुरेलने मागे झेलबाद केले.गेल्या आठवड्यात इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यासाठी अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी आणि वेगवान गोलंदाज आकाश दीप आणि अर्शदीप सिंग जखमी झाल्यानंतर अंशुलचा भारतीय संघात समावेश करण्यात आला. अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी सुरू होण्यापूर्वी तो इंग्लंड लायन्सविरुद्ध इंडिया अ संघाचा भाग होता. मुकेश कुमार आणि हर्षित राणा सारख्या कसोटी क्रिकेटपटूंसोबत, कंबोजने त्याच्या सीम बॉलिंगने सर्वांना प्रभावित केले.मात्र, पहिल्या कसोटीसाठी त्याची निवड झाली नाही आणि जखमी खेळाडूसाठी कव्हर म्हणून हर्षितला संघात समाविष्ट करण्यात आले. अंशुलने २०२३ मध्ये विजय हजारे ट्रॉफीमध्ये १० सामन्यांमध्ये १७ विकेट्स घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि हरियाणाला ट्रॉफी जिंकण्यास मदत केली. या कामगिरीनंतर आयपीएल स्काउट्सनी त्याच्यावर लक्ष केंद्रित केले आणि त्याला मुंबई इंडियन्सने खरेदी केले. आयपीएल २०२४ मध्ये त्याने तीन सामने खेळले. आयपीएलच्या या हंगामात तो चेन्नई सुपर किंग्जकडून खेळला. या रणजी हंगामात त्याने एकाच सामन्यात १० विकेट्स काढल्या आणि यामुळे तो चर्चेचा विषय ठरला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# श्रावण महिना, महत्त्व आणि सण समारंभ

आपल्या भारत देशाला सण, समारंभ आणि उत्सवांचा देश म्हणून ओळखतात. आपल्याकडे प्रत्येक ऋतूप्रमाणे सण आणि उत्सवांचे आयोजन केले गेले असल्याचे दिसून येते. यातला सर्वात मोठा सण-उत्सवांचा काळ आहे तो श्रावण महिन्याचा. सगळीकडे पावसाची संततधार सूरू असते आणि देशाच्या विविध भागात त्या त्या भागातील पद्धती, धर्मातील रूढी परंपरांप्रमाणे अनेक लहान मोठ्या सण-समारंभांची रेलचेल आपल्याला अनुभवता येते.

श्रावण महिना हा सात्विक, भक्तीभावाने पुनित असा महिना मानला जातो. या महिन्यात अनेक व्रत-वैकल्ये केले जातात. या एका महिन्यात अनेक लहान मोठ्या सणांचे , व्रतांचे आयोजन करून त्यांचा आनंद घेतला जातो. आजच्या ङ्गमिसलेनियस भारतफ्च्या लेखात आपण श्रावण महिन्यात साजरे करण्यात येणाऱ्या सणांची माहिती करून घेणार आहोत.



### श्रावणी सोमवार

श्रावण महिना हा भगवान शंकराच्या उपासनेचा महिना मानला जातो. त्यामुळे जे लोक श्रावण महिना भक्तीभावने पाळतात ते या महिन्याच्या प्रत्येक सोमवारी शंकराची आराधना करून उपवास करतात. महिन्यात येणाऱ्या चार किंवा पाच सोमवारी शंकराची यथायोग्य पूजा करून दिवसभर शक्य असेल तर उपवास केला जातो. संध्याकाळी सात्विक भोजन करून या उपवासाची सांगता केली जाते.

### मंगळागौर पूजन

महिलांमधील हे एक लोकप्रिय व्रत म्हणता येईल. नवीन लग्न झालेल्या मुलींनी लग्नानंतरच्या पहिल्या श्रावणापासून. पुढील पाच वर्षे हे व्रत करायचे असते. इतर ओळखीतल्या नववधूंना बोलावून मंगळागौरीची पूजा मांडून, पूजा, आरती करून हे व्रत करतात. संध्याकाळी हळदीकूंकवाचा कार्यक्रम ठेवून, विविध मंगळागौरीचे खेळ, फुगड्या खेळून रात्र जागविली जाते.यावेळी गायली जाणारी गाणी हा मराठी गाण्यांचा मोठा ठेवा आहे. मंगळागौर म्हणजे ङ्गपार्वतीफ शंकर आणि पार्वती हे गृहस्थाश्रमाचे आदर्श उदाहरण मानतात. त्यामुळे आपलाही संसार सुखाचा व्हावा म्हणून ही पूजा करतात. पूर्वीच्या काळी मुलींची लग्न लवकर होत. तसेच स्त्रियांना एरवी बाहेर जाण्याची मुभा त्याकाळी नसे. त्यामुळे अशा सामाजिकरित्या साजऱ्या केल्या जाणाऱ्या व्रतातून मुलींना विरंगुळा मिळत असे. त्यासाठीच अशा व्रतांची योजना आपल्याकडे करण्यात आल्याचे दिसून येते. आज काळ बदलला असला तरी, या व्रतांमुळे महिला वर्गाला वेगळा आनंद मिळतो हे नक्की. आजही हे सण तितक्याच उत्साहाने त्यासाठीच साजरे केले जातात.

### नागपंचमी-

नागपंचमी हा सण श्रावण महिन्यातील एक असा सण आहे ज्याचा संबंध आपल्या पर्यावरणाशी जोडला गेलेला सण आहे. या दिवशी घरोघरी नागाची अथवा आपल्या परिसरात असेल तर नागाच्या वारूळाची पूजा केली जाते. नागदेवतेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही पूजा केली जाते. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्यादिवसापासून नागपूजा करण्यात येते असे सांगण्यात येते.

या सणाच्या निमित्ताने पूर्वी विशेषतः ग्रामीण भागात विवाहित बहिणीला तिचा भाऊ माहेरी घेऊन येण्याची प्रथा आहे. गावातील सर्व मुली, स्त्रिया झाडाला मोठे झोके बांधून गाणी गातात, झोके घेतात. कुठे, कुठे मुली हौशीने मेहेंदी काढतात, बांगड्या भरतात. अनेक ठिकाणी मुली या नागपंचमीच्या आधी काहि दिवस एकत्र येऊन फेर धरतात, गाणी गातात, झिम्मा फुगडी खेळतात. पूर्वी मुलींची लग्ने लहान वयात केली जात, त्यामुळे संसाराच्या ओझ्याखाली दबलेल्या मुलींना सासरहून माहेरी आणून थोडा विरंगुळा मिळावा हा हेतू नागपंचमीच्या सणाच्या या सर्व प्रथांमधून दिसून येतो.

### जिवंतिका पूजन

संपूर्ण श्रावण महिन्यात या जिवंतिका देवीची प्रतिमा देवघरातल्या भिंतीवर लावून हे जिवंतिका व्रत केले जाते. श्रावणाच्या प्रत्येक शुक्रवारी जिवत्यांना कापसाचे वस्त्र, दुर्वा वाहून त्यांची माळ अर्पण करतात. पूजा करून पुरणाचा नेवैद्य दाखवून एका सवाष्णीला विशेषतः जिला लहान मूल आहे तिला जेवायला बोलावून तिची ओटी भरून हे व्रत केले जाते. काही ठिकाणी लहान मुलांचे औक्षण करण्याचीही पद्धत आहे. याशिवाय दर शुक्रवारी संध्याकाळी दुध- फुटाण्याचा नैवेद्य दाखवून सवाष्णींना हळदीकूंकवाला बोलावले जाते. हि पूजा मुलांच्या आरोग्यासाठी, सुखरूपतेसाठी आणि दिर्घायुष्यासाठी केली जाते.

### रक्षाबंधन-

श्रावणात येणारा हा आणखी एक लोकप्रिय सण. बहिण-भावाचं प्रेम व्यक्त करण्याचा हा एक आपल्या संस्कृतीतला सुंदर सोहळा. हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. या दिवशी बहिण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून भावाला दीर्घ आयुष्य व सुख मिळो अशी कामना करतात.

### पोळा

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे आपल्या अनेक सणांमध्ये निसर्ग, त्यातले प्राणी, पक्षी, झाडे यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अनेक सण साजरे करण्याच्या प्रथा आहेत. यातील शेतकरी राजाच्या घरात मोठ्या उत्साहाने साजरा होणारा सण म्हणजे ङ्गपोळाफ शेतकऱ्यांचा जिवाभावाचा मित्र आहे, बैल. ज्याच्यामुळे त्याच्या जमिनीची नांगरणी केली जाते, शेतात पिकं घेतली जातात.

अशा बैलांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीचा दिवस म्हणजे बैल पोळा. शेतकऱ्यांच्या घरात अगदी दिवाळी प्रमाणे या सणाची वाट पाहिली जाते. बैलांना त्यादिवशी अंघोळ घालून, त्यांना छान सजवून, त्यांची गावातून मिरवणूक काढली जाते. त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून या दिवशी त्यांना गोडधोडाचे जेवण घातले जाते. शहरातही अनेक ठिकाणी मातीचे बैल आणून हा सण साजरा करण्याची प्रथा आहे.

श्रावणी अमावस्या ,पिठोरी अमावस्याश्रावण महिन्यातील कृष्ण पक्ष अमावस्येला हरियाली अमावस्या किंवा पिठोरी अमावस्या असे म्हणतात. या दिवसाला पर्यवरणीय महत्त्व आहे. यादिवशी जर झाडे लावली तर ती जोमाने वाढतात अशी समजूत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी या दिवसाचे महत्त्व फार आहे. या दिवशी अनेकजण वृक्षारोपण करतात. तसेच काही ठिकाणी यालामातृदिवसाचेही महत्त्व आहे.

यादिवशी आई मुलांसाठी व्रत करते. खीर पुरी करून मुलांना ती दिव्यासह त्याचे वाण देते. अशा अनेक प्रथा या एका दिवसाशी जोडल्या गेलेल्या आहेत. जसा परदेशात मातृ दिवस साजरा केला जातो तसाच हा एकप्रकारे आपल्या संस्कृतीतील मातृदिवसच आहे.

श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाला

हा श्रावण महिन्यात येणारा शेवटचा पण अत्यंत लोकप्रिय आणि मोठा सण. श्रावणातील वद्य अष्टमीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदिशाळेत देवकीच्या पोटी श्रीकृष्णाचा जन्म झाला. म्हणून या दिवशी कृष्ण जन्माष्टमी संपूर्ण भारतात मोठ्या जल्लोषाच साजरी केली जाते. त्याच्या दुसर्या दिवशी गोपाळकाला केला केला जातो. दहिहंडी फोडली जाते. पुर्वी हा सण घरगुती पद्धतीने साजरा केला जायचा पण आज त्याला बरेच मोठे सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप आलेले आहे. असा हा श्रावण महिना घेऊन येतो आनंद, उत्साह आणि जगण्याची नवी उमेद. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात काही क्षण उत्सवाच्या निमित्ताने सर्वांसह मिळून आनंदाने घालवायला असे सण समारंभ नक्कीच हवे असतात. वर्षभराची ऊर्जा देणारा हा श्रावण महिना आरोग्य,पर्यावरण,संस्कृतीचा सर्वांगीण विचार करणाराच आहे असे म्हणता येईल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अधिकाऱ्याचा टोकाचा उद्धटपणा, नागरिकांना शिवीगाळ, बाहेर निघा असा दम; नोंदी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांच्यावर गंभीर आरोप...

**पुणे :** राज्याचे नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांचं वर्तन अलीकडच्या काळात प्रचंड वादग्रस्त ठरत आहे. नोंदणीप्रक्रियेत सातत्याने येणाऱ्या अडचणी, सर्व्हर डाऊन, अपॉईंटमेंट मिळवण्यात होणाऱ्या त्रासाबाबत चौकशीसाठी त्यांच्याकडे गेलेल्या नागरिकांना बिनवडे यांनी अक्षरशः अपमानित करून हाकलल्याची घटना घडली आहे. घटनेनुसार, पुण्यातील नागरिक आणि स्वाभिमानी ब्रिगेड संघटनेचे अध्यक्ष रोहन सुरवसे पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी नोंदणी कार्यालयामध्ये राज्यभर सतत जाणवत असलेल्या सर्व्हर स्लो डाउन आणि अपॉईंटमेंट प्रणालीतील त्रुटीबाबत निवेदन देण्यासाठी बिनवडे यांच्या केबिनमध्ये प्रवेश केला. मात्र, अपेक्षेच्या पूर्ण विरोधात, रवींद्र बिनवडे यांनी अत्यंत उद्धट आणि अरेरावीचा सुर पकडत , ङ्खतुम्हाला काय करायचं आहे? आम्ही आमचं बघून घेऊ... बाहेर निघा!ङ्ख, अशा स्वरूपातील अपमानास्पद भाषा वापरली.स्वाभिमानी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार,




ङ्खआम्ही सामान्य नागरिकांचे प्रश्न घेऊन गेलो. मात्र बिनवडे यांनी आम्हाला गुन्हेगारांप्रमाणे हाकलून लावले. त्यांनी शिवीगाळ केली, आवाज चढवला आणि स्पष्ट शब्दांत सांगितलं की, त्यांच्या ऑफिसमध्ये आमचं काहीही काम नाही.ङ्ख या घटनेचा निषेध करत स्वाभिमानी ब्रिगेडने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे याबाबतची तक्रार करण्याचा निर्णय घेतला आहे.संघटनेचे अध्यक्ष रोहन सुरवसे पाटील म्हणाले, ङ्खरवींद्र बिनवडे हे सरकारी अधिकाऱ्याचे कर्तव्य विसरले आहेत. लोकांचे प्रश्न ऐकणं, त्यावर उपाय शोधणं हे त्यांचं आद्य कर्तव्य आहे. मात्र ते अधिकाराच्या नशेत जनतेचा अपमान करत आहेत. हे खपवून घेतलं जाणार नाही. आम्ही लवकरच मंत्रालयात भेट घेऊन तक्रार करणार आहोत.रवींद्र बिनवडे हे यापूर्वी पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्या काळातही त्यांचं वर्तन अनेकदा वादग्रस्त झालं होतं, अशी माहिती काही नगरसेवकांकडून देण्यात आली आहे. सध्या ते राज्याचे नोंदी महानिरीक्षक पदावर कार्यरत असून, त्यांच्या कार्यालयाकडून सर्व राज्यातील ऑनलाईन नोंदणी आणि दस्त नोंद प्रक्रियेवर नियंत्रण ठेवले जाते.

राज्यातील सर्व नोंदणी कार्यालयांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सर्व्हर स्लो, अपॉईंटमेंट अडचणी, आणि हस्तांतर प्रक्रियेत विलंब या बाबी मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूरसारख्या शहरांत नागरिक दिवसेंदिवस त्रस्त होत आहेत. तथापि, या अडचणींबाबत उच्च अधिकाऱ्यांकडून कुठलाही ठोस प्रतिसाद मिळत नसल्याने नागरिकांचा रोष वाढू लागला आहे.

# यशस्वी जयस्वालने रचला इतिहास, आतापर्यंत कोणालाही असा रेकॉर्ड कधीच जमला नाही...

**मँचेस्टर:** यशस्वी जयस्वालने दमदार खेळी साकारत चौथ्या कसोटी सामन्यात भारताला चांगली सुरुवात करुन दिली. पण त्याचबरोबर यशस्वी जयस्वालने या सामन्यात असा रेकॉर्ड रचला आहे की, जो आतापर्यंत कोणालाही जमला नाही.मँचेस्टरची खेळपट्टी ही वेगवान गोलंदाजांना फायदा देणारी असते. त्यामुळे या खेळपट्टीवर फलंदाजी करणे सोपे नसते. त्यामुळेच इंग्लंडने टॉस जिंकल्यावर प्रथम भारताला फलंदाजीसाठी पाचारण केले. पहिल्या सत्रात भारताच्या २-३ विकेट्स काढण्याचे स्वप्न ते पाहत होते. यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल यांनी कडवा प्रतिकार करत इंग्लंडचे स्वप्न बेचिराख केले. खासकरून यशस्वी जयस्वालने यावेळी एक असा विक्रमर रचला आहे जो आतापर्यंत कोणालाही करता आला नाहीयशस्वी जयस्वालने या सामन्यात दमदार फलंदाजी केली. यशस्वीने यावेळी इंग्लंडच्या गोलंदाजीचा असा प्रतिकार केला की, त्याने भारताला धक्का बसण्यापासून वाचवले.





यशस्वीने या सामन्यात आपले अर्धशतकही झळकावले. यशस्वी जयस्वाल शतकाच्या दिशेने कूच करतच होता, पण त्याचवेळी त्याला इंग्लंडचा फिरकीपटू लायम डॉसनने बाद केले. पण बाद होण्यापूर्वी यशस्वी जयस्वालने असा एक विक्रम रचला, जो आतापर्यंत कोणालाही करता आला नव्हता. हा सामना मँचेस्टरच्या मैदानात सुरु आहे.

आतापर्यंत या मैदानात भारताच्या एकाही सलामीवीराला कधीच अर्धशतक झळकावता आले नव्हते. त्यामुळे या मँचेस्टरच्या मैदानात अर्धशतक झळकावणारा यशस्वी जयस्वाल हा भारताचा पहिलाच सलामीवीर ठरला आहे. यशस्वी जयस्वालने या सामन्यात १० चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५८ धावांची दमदार खेळी साकारली. त्यामुळेच भारताला या सामन्यात चांगली सुरुवात मिळू शकली आणि भारताचा डाव स्थिरस्थावर होऊ शकला. पण डॉसनने टाकलेल्या चेंडूवर यशस्वी जयस्वाल फसला आणि आपली विकेट तो गमावून जबसल्याचे पाहायला मिळालेयशस्वी जयस्वालने या सामन्यात संयतपणे फलंदाजी केली. यशस्वी हा आक्रमकपणे फटकेबाजी करतो. पण या सामन्यात त्याने आपला खेळ बदलला आणि फटकेबाजीला मुरड घातल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळेच या डावात यशस्वी जयस्वालला अर्धशतक झळकावण्यात यश आल्याचे सर्वांना पाहायला मिळाले.

# बायको गेली पण ड्रामा बाकी!

## रिंकू राजगुरू आणि सुबोध भावे यांची हटके लव्ह स्टोरी ; प्रार्थनासोबत लव्ह ट्रँगल?



**मुंबई:** अभिनेत्री रिंकू राजगुरू , प्रार्थना बेहेरे, अभिनेता सुबोध भावे , अनिकेत विश्वासराव असे मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय कलाकार असणारा रोमँटिक विनोदी चित्रपट पुढी महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, या सिनमाचे बेटर-हाफची लव्हस्टोरी असे हटके नाव आहे. सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा यांच्या या चित्रपटाचा टीजर नुकताच प्रदर्शित झाला.बेटर-हाफची लव्हस्टोरी या चित्रपटाचा टीजर प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारा ठरला. या सिनेमाची कथा सुबोध भावे यांच्या पात्राभोवती फिरते, ज्याच्या पत्नीचे निधन झाले आहे, पण तरीही त्याला तिचा भास होतो. त्यातून बाहेर पडण्यासाठी तो प्रयत्न करत आहे. या एकूणच प्रक्रियेत विनोद निर्मिती होते आणि त्यात रहस्यही आहे. येत्या २२ ऑगस्ट रोजी या रहस्याचा उलगडा होणार आहे.दरम्यान सिनेमाच्या पोस्टरवरुन रिंकू आणि सुबोध नवरा-बायको असावेत असे वाटते, टीजरमध्येही ते एकमेकांना मिठी मारताना दिसले आहेत. अनिकेतने सुबोधच्या मित्राची भूमिका साकारली आहे. आता प्रार्थनाची भूमिका काय असेल हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. बायको गेली पण ड्रामा अजून बाकी आहे! प्रेमाच्या गोंधळात खळखळून हसवायला येतेय ही आगळीवेगळी बेटर-हाफ ची लव्हस्टोरी, असे कॅप्शन देत सोशल मीडियावर हा टीजर शेअर करण्यात आला आहे.दरम्यान संजय अमर यांनी या चित्रपटाचे लेखन, छायांकन आणि दिग्दर्शन केले आहे. रजत मीडिया एंटरटेनमेंटने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. साजन पटेल आणि अमेय नरे यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. संजय अमर यांनी असे म्हटले की, आजच्या प्रेक्षकांना ही कथा नक्की आवडेल. आम्ही विनोदी पद्धतीने काहीतरी वेगळे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हा चित्रपट सगळ्या वयोगटातील लोकांना आवडेल. तर निर्माते रजत अग्रवाल यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, ही कहाणी फक्त मनोरंजन करणारी नाही, तर एक वेगळा अनुभव देणारी कथा आहे. आम्ही उत्तम कलाकार आणि एक नवीन कथा घेऊन आलो आहोत.

# केडीएमसीत भ्रष्टाचाराचा महापूर, लाचखोरांचा स्फोट, एसीबीने एकाच दिवशी ३ अधिकाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या...



**कल्याण :** केडीएमसीमध्ये भ्रष्टाचाराचा पुन्हा एक नवा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे लाचलुचपत विभागाने म्हणजेच एसीबीने लाचखोरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मुसक्या देखील आवळल्या आहेत. केडीएमसीच्या एखाद्या लाचखोर अधिकाऱ्याविरोधात कारवाई होण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीदेखील अनेकदा अशाप्रकारच्या घटना समोर आल्या आहेत. पण तरीदेखील या घटना कमी होण्याचं नाव घेताना दिसत नाहीत. गेल्या पाच वर्षांपासून केडीएमसीच्या निवडणुका रखडल्या आहेत. इथे अधिकाऱ्यांच्या हातात सर्व यंत्रणा आहे. पण त्याचाच अधिकारी गैरवापर करताना दिसत आहेत. यातून भ्रष्टाचाराचा महापूर येताना दिसतोय. एसीबीने आजच्या कारवाईत तब्बल ३ अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत. केडीएमसीमध्ये एकाच दिवशी तीन अधिकाऱ्यांना ठाणे लाचलुचपत विभागाकडून रंगेहात अटक करण्यात आली आहे. पालिकेचे घनकचरा विभागाचे अधिकारी वसंत देवळूरकर, सुदर्शन जाधव यांना अटक करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांनी आजारी कर्मचाऱ्याला कामावर रुजू करण्यासाठी २५ हजार रुपयांची मागणी केली होती. लाचलुचपत विभागाने २० हजारांची लाच घेताना दोन्ही अधिकाऱ्यांना ताब्यात घेतलं आहे.

तसेच केडीएमसीच्या सहाय्यक अभियंता रवींद्र आहिरे याला बांधकाम परवानगी देण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाकडून ४० हजार रुपये लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली. आतापर्यंत केडीएमसीमधील ४७ अधिकारी आणि कर्मचारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात सापडले आहेतया घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुका लवकरात लवकर घेण्यात याव्यात, अशी मागणी जोर धरु लागली आहे. महापालिका निवडणुका झाल्यानंतर अधिकारी वर्गाचा भ्रष्टाचार आणि मनमानी कराभरावर लगाम बसेल, असं सामाजिक कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे.

दरम्यान, मनसे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांनी लालचलुचपत विभागाच्या कारवाईनंतर आपल्या एक्स अकाउंटवर भूमिका मांडली आहे. त्यांनी जसे राज्यकर्ते तसे अधिकारी, अशा शिर्षकाखाली निशाणा साधला आहे. ङ्कङ्कआज पुन्हा एकदा चे ३ भ्रष्ट अधिकारी एकाच दिवशी लाचलुचपत विभागाच्या सापळ्यात सापडले. एकंदरीतच संपूर्ण मधील जनता या भ्रष्ट सत्ताधारी आणि अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे फोफावलेल्या अनागोंदीच्या सापळ्यात अडकली आहे. परंतु याचे आमच्या शासनकर्त्यांना काहीच सोयरसुतक नाही. हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. त्यांचे नेहमीचे एकच घोषवाक्य आहे , ङ्कअपना काम है बनता, भाड मे जाये जनता बरोबर ना?ङ्कङ्क, असा प्रश्न उपस्थिती केला आहे.

# ओंकारने हास्यजत्रा सोडल्यानंतर मी एकटा पडलो... भोजनेबद्दल असं का म्हणाला गौरव मोरे?



**मुंबई -** गौरव मोरे सध्या चला हवा येऊ द्या या कार्यक्रमामुळे चर्चेत आहे. गौरव लवकरच झी मराठी वाहिनीवरील चला हवा येऊ द्याच्या दुसऱ्या पर्वात झळकणार आहे. मात्र, काही वर्षांपूर्वी गौरव महाराष्ट्राची हास्यजत्रा हा कार्यक्रम सोडल्यामुळे चर्चेत आला होता. गौरवला महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमामुळे लोकप्रियता मिळाली. त्यामुळेच तो घराघरात पोहोचला आणि त्याला सगळेच फिल्टरपाड्याचा बच्चन म्हणून ओळखू लागले. अशातच आता एका मुलाखतीदरम्यान गौरवने हास्यजत्रेतील त्याच्या मित्रांबद्दल भाष्य केलं आहेगौरव मोरेच्या आधी महाराष्ट्राची हास्यजत्रा या शोमधून ओंकार भोजनेनंही एक्झिट घेतली. लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान ओंकार भोजनेबद्दल गौरव म्हणाला की, ओंकार अजूनही माझ्या कॉन्टॅक्टमध्ये आहे. आठवड्यातून एकदा किंवा महिन्यातून एकदा आम्ही फोन करतो. आमचं बॉण्डिंग खूप चांगलंय आणि आम्ही एकत्र खूप काम केलंय. तो गेल्यानंतर मी एकटा पडलो. तो माझा चांगला मित्र आणि एक उत्तम अभिनेता आहे. पण जसं मी पाच वर्षांनी हास्यजत्रा सोडली तसंच त्याचं पण काहीतरी कारण असेल. तो सध्या सिनेमा, नाटकांत काम करतोय. कधी कधी आम्ही भेटतोदेखील.याच मुलाखतीत गौरवला विचारण्यात आलं की, हास्यजत्रेमधून पुन्हा बोलावण्यात आलं तर तू जाशील का? त्यावर तो म्हणाला की, नाही, आता कठीण आहे जरा. कारण आता मी चला हवा येऊ द्यामध्ये काम करतोय ना, त्याच्यामुळे. पुढे स्वतःच्या सिनेमाचं प्रमोशन करायला हास्यजत्रेमध्ये जाणार का? त्यावर गौरव म्हणाला की, पण आता आपल्याकडे आहे चला हवा येऊ द्या, माझं आहे ना आता तिथे.दरम्यान, गौरवसोबतच चला हवा येऊ द्या मध्ये कुशल बद्रिके, भारत गणेशपुरे, प्रियदर्शन जाधव आणि श्रेया बुगडेसुद्धा असणार आहेत. गौरव मोरेच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं झाल्यास, जयभीम पँथर एक संघर्षफ नावाच्या चित्रपटात झळकला होता. हा सिनेमा ११ एप्रिल २०२५ रोजी प्रदर्शित झालेला. या सिनेमामध्ये गौरव मोरेसोबत मिलिंद शिंदे, शशांक शेंडे, जयवंत वाडकर, अभिजीत चव्हाण, संजय कुलकर्णी, चिन्मय उदगीरकर यांसारखे अनेक कलाकार झळकले होते.

# भारत आणि इंग्लंडमध्ये होणार पाच टी आणि तीन वनडे...



**लंडन :** भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच टी २० आणि तीन वनडे सामने खेळवण्यात येणार आहे. पण हे सामने कधी आणि कुठे होणार आहेत, याचे वेळापत्रक आता समोर आले आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यात सध्याच्या घडीला कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील तीन सामने झाले आहेत आणि चौथा कसोटी सामना सुरु आहे. या कसोटी मालिकेत इंग्लंडकडे सध्याच्या घडीला २-१ अशी आघाडी आहे. पण आता भारत आणि इंग्लंड यांच्यात टी २० आणि वनडे मालिका कधी होणार, याती संपूर्ण माहिती समोर आली आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिला टी २० सामना हा १ जुलैला दरहाम येथे होणार आहे. त्यानंतर भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा टी २० सामना हा मँचेस्टर येथे खेळवण्यात येणार आहे. या मालिकेतील तिसरा टी २० सामना हा ७ जुलैला ट्रेंट ब्रिज येथे खेळवला जाणार आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा टी २० सामना ९ जुलैला ब्रिस्टलच्या मैदानात होईल. या मालिकेतील पाचवा आणि अखेरचा टी २० सामना हा ११ जुलैला साऊदम्प्टनमध्ये खेळवण्यात येणार आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यात तीन वनडे सामने खेळवले जाणार आहेत. भारत आणि इंग्लंड यांच्यात पहिला वनडे सामना हा १४ जुलै या दिवशी बर्मिंगहमच्या मैदानात खेळवला जाणार आहे. या वनडे मालिकेतील दुसरा सामना १६ जुलैला कार्डिफ येथे होणार आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा आणि अखेरचा वनडे सामना हा १९ जुलैला क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्सच्या मैदानात खेळवला जाणार आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना चाहत्यांना पाहता येणार आहेया मालिकेतील पहिला सामना इंग्लंडने जिंकला होती. पण त्यानंतर दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने पुनरागमन केले आणि सामना जिंकला. त्यामुळे मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली होती. त्यानंतर तिसऱ्या कसोटीत इंग्लंडने भारतावर थरारक विजय साकारला. त्यामुळे इंग्लंडला आघाडी मिळाली. त्यामुळे आता चौथा सामना हा दोन्ही संघांसाठी निर्णायक असेल. कारण इंग्लंडने सामना जिंकला तर ते मालिका जिंकतील आणि भारताने जिंकला तर मालिकेत त्यांना २-२ अशी बरोबरी करता येईल. त्यामुळे हा सामना दोन्ही संघासाठी निर्णायक ठरणार आहे.

# श्री संत गजानन महाराज पालखी मिरवणूक; वाहतूक मार्गात बदल

## जिल्हाधिकारी यांचे आदेश

**जनसंचलन/बुलढाणा**

श्री संत गजानन महाराज यांची पंढरपूरहून परतीची पालखी दि. ३१ जुलै २०२५ रोजी खामगावमध्ये येणार असून, यानिमित्ताने अंदाजे दोन ते अडीच लाख भाविकांचा सहभाग अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने परतीच्या प्रवासा दरम्यान भाविकांच्या सुरक्षितता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी वाहतूक मार्गात बदलाचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार ३१ जुलै रोजी पहाटे ३.०० वाजेपासून ते पालखीचे आगमन होईपावेतो सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत खामगांव ते शेगांव रोडवरील वाहतूक बंद करण्यात आली असून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पर्यायी वाहतूक मार्ग: शेगाव बसस्थानकाकडून खामगावकडे जाणारी वाहतूक अण्णाभाऊ साठे चौक, राजे संभाजी महाराज चौक, मुरारका विद्यालय चौक, जय ज्योती चौक, जय क्रांती चौक, आनंद विसावा,आनंद सागर समोरुन बाळापूर रोडलं जवळा, पळसखेड, गव्हाण मार्गे खामगाव व याचप्रमाणे शेगावकडे येणारी वाहतूकीसाठी पर्याय मार्ग राहिल. अकोट व वरवट बकाल मार्गे येणारी वाहतूक (मोठे ट्रक व कंटेनर वगळून) झाडेगाव फाटा, इंदिरा नगर, भुस्कुटी मळा जवळून, महात्मा फुले चौक, संविधान चौक, तिन पुतळे चौक, सावित्रीबाई फुले चौक, जय ज्योती चौक, जय क्रांती चौक, आनंद सागर समोरून पुढे खामगाव किंवा अकोलाकडे रवाना होईल. अकोट व वरवट बकाल मार्गे येणारी अवजड वाहतूक (मोठे ट्रक, कंटेनर, बसेस) उड्डाण पुलावरुन छत्रपती शिवाजी महाराज चौक, अग्रसेन चौक, बसस्थानक समोरुन पशु वैद्यकीय दवाखान्यासमोरुन अण्णाभाऊ साठे चौक, राजे संभाजी महाराज चौक, मुरारका विद्यालय चौक, जय ज्योती चौक, आनंद विसावा, आनंद सागर समोरून बाळापूर रोडने खामगाव किंवा अकोलाकडे रवाना होईल. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सामान्य रुग्णालय समोरुन नवीन कॉंक्रीट रोडने संस्थानचे पार्किंगचे मागील बाजूने चारमोरी. अग्रसेन चौक ते पशुवैद्यकीय रुग्णालय, महेश चौक, आठवडी बाजार गल्ली, भैरव चौक, इकबाल चौक, गाझीपुरा, माळीपुरा,



नागझरी रोड. जगदंबा चौक, मुरारका शाळा, शिवनेरी चौक, अशफाक उल्ला चौक, जामा मशिद समोरुन माळीपुरा व नागझरी रोड राहिल. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गजानन महाराज मंदिर मार्गावरील वाहतुक दुपारी २ ते ६.३० वाजेपर्यंत बंद राहिल. वाहतूक नियमभंग केल्यास संबंधितावर मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३१ नुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आदेशाव्दारे कळविण्यात आले आहे.

# बुलढाण्यातून बदलून गेली जळगावात पकडल्या गेली!

## जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी माधूरी भागवत ५ हजाराची लाच घेतांना एसीबीच्या जाळ्यात



**जनसंचलन/बुलडाणा**

गत वर्षी समाज कल्याण विभाग, बुलढाणा अंतर्गत दिव्यांग विभागातून बदली झालेल्या व हल्ली जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी म्हणून प्रिंप्राळा,जळगाव येथे कार्यरत असलेल्या माधूरी भागवत ह्या ५ हजाराची लाच घेताना नाशिक येथील एसीबीच्या जाळ्यात अडकल्या आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयातील खाबुगिरी चव्हाट्यावर आली आहे. या घटनेतील तक्रारदार हे भौतिक उपचार तज्ञ तथा प्रभारी अधिक्षक वर्ग २ या पदावर शासकिय दिव्यांग समिश्र केंद्र, जळगांव या कार्यालयात कार्यरत आहेत. ते १४ जुलै रोजी पगार बिलाच्या कामासंदर्भात जिल्हा दिव्यांग विभाग, जिल्हा परीषद कार्यालय, जळगांव येथे गेले होते. त्यांनी श्रीमती माधुरी भागवत, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांची भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांचे जुन २०२५ पगार बीलामध्ये काहीही त्रुटी न काढता पगार बीलाबर सह्या करून ते पुढे जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे पाठवण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांच्याकडे १२,००० रू. लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी २२ जुलै रोजी मिक्सर प्रतिबंधक विभाग जळगाव यांचेकडे लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीप्रमाणे दिनांक २२ जुलै रोजी लाच पडताळणी केली असता,यातील श्रीमती माधुरी भागवत यांनी १०,००० रु. लाचेची मागणी करून, तडजोडी अंती प्रथम हफ्ता म्हणून ५,००० रुपये व उर्वरित ५,००० रुपये रक्कम इतर बिले निघाल्यावर दया, अशी पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. २४ जुलै रोजी श्रीमती माधुरी भागवत यांनी तक्रारदार यांचेकडून ५,००० रूपयांच्या लाचेची रक्कम स्वतः पंचासमक्ष स्वीकारली. ही कारवाई जळगाव व नाशिक एसीबी पथकाने केली आहे. या प्रकरणी जळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य




**जनसंचलन/बुलडाणा**

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा यासाठी शेतकरी ओळख क्रमांक १५ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अजूनही शेतकरी ओळख क्रमांक बनवलेले नसेल, तर त्यांनी तात्काळ आपल्या नजीकच्या नागरी सुविधा केंद्र किंवा ग्राम कृषी विकास समितीकडे जाऊन नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक बनवून घ्यावा, असे आवाहन कृषि उपसंचालक अनुराधा गावडे यांनी केले आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत एकूण ४ लाख ३४ हजार ४६८ लाभार्थी असून, त्यापैकी ३ लक्ष १४ हजार ३०२ शेतकऱ्यांनी आतापर्यंत फार्मर आयडी काढले आहेत. पीक कर्ज, पीक विमा, किसान क्रेडिट कार्ड, पीएम किसान योजनेचे अनुदान, नैसर्गिक आपत्ती मदत अशा शासनाच्या विविध योजनेसाठी फार्मर आयडी अनिवार्य आहे.

शेतकरी ओळख क्रमांक अंतर्गत कृषी व संलग्न विभागाकडून शेतकऱ्यांच्या शेताची, आधार क्रमांकाशी संलग्न अशी माहिती एकत्र करून ङ्ङ्घफार्मर रजिस्ट्रीङ्ङ्घ तयार करण्यात येणार आहे. या माहितीच्या आधारे लाभार्थ्यांची अचूक निवड करून कृषी योजनांचा लाभ अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने वितरित करता येईल. शेतकरी ओळख क्रमांक तयार झाल्यानंतर शेतकऱ्यांना वारंवार प्रमाणिकरण करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच सातबारा उतारा आधार कार्डाशी लिंक करून ठेवणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, आधारशी लिंक असलेले बँक खाते, ७/१२ उतारा (सातबारा) किंवा नमुना ८. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ४ लाख १७ हजार ५० शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात ङ्फार्मर आयडीफ तयार करण्यात आले आहेत. शेतकरी ओळख क्रमांक शिवाय कृषी विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतकरी ओळख क्रमांक त्वरित बनवून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# एका संजयचा दुसऱ्या संजयच्या बालेकिल्ल्याला भगदाड पाडण्याचा प्रयत्न!

जनसंचलन/ जळगाव जामोद

जिल्ह्यातील राजकारणात एका महत्त्वपूर्ण घडामोडीची नोंद झाली. आ. संजय कुटे यांच्या मतदारसंघातील माजी सैनिक वसंत उत्तमराव मिरगे आणि त्यांच्या सोबत असलेल्या शेकडो तरुण कार्यकर्त्यांनी धर्मवीर आमदार संजुभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन शिवसेना मातोश्री जनसंपर्क कार्यालय, बुलढाणा येथे करण्यात आले होते. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार व केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला. यावेळी आमदार संजय गायकवाड यांनी पक्षप्रवेश करणाऱ्या सर्व युवकांचे स्वागत केले. 'शिवसेना ही सामान्य जनतेच्या अधिकारांची चळवळ आहे. नव्याने प्रवेश केलेल्या युवकांनी निष्ठेने आणि जोमाने कामाला लागून शिवसेनेचा विचार घराघरात पोहचवावा. हा





केवळ पक्षप्रवेश नाही, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत पावित्र्याने उडी घेणारी एक शपथ आहे. असे यावेळी गायकवाड म्हणाले.पक्षप्रवेश केलेले माजी सैनिक वसंत मिरगे हे दिवंगत भाजपा नेते स्व. उत्तमराव मिरगे यांचे पुत्र असून, सैनिकी सेवेत देशासाठी योगदान दिल्यानंतर आता जनसेवेच्या माध्यमातून जनतेसाठी काम करण्याचा नवा अध्याय त्यांनी सुरू केला आहे. आ.संजय गायकवाडांचे कार्य, त्यांच्या बोलण्यातला आत्मविश्वास आणि युवकांप्रती असलेली आत्मीयता पाहूनच हा निर्णय घेतला आहे,असे वसंत मिरगे यांनी भावनिक शब्दांत सांगितले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य युवासेनेचे कार्यकारिणी सदस्य व युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, उपजिल्हाप्रमुख अशोक टावरी, जळगाव जामोद तालुकाप्रमुख अजय पारस्कर यांच्यासह युवासेना व महिला आघाडीचे पदाधिकारी आणि शिवसैनिक तसेच वसंतराव मिरगे मित्र परिवारातील सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शेतकऱ्यांजवळून पिक विमा बद्दल प्रत्येकी एक एक रुपया घेते,कारण महाराष्ट्र शासन भिकारी- कोकाटे

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत शेतकऱ्यांजवळून पिक विमा बद्दल प्रत्येकी एक एक रुपया घेते,कारण महाराष्ट्र शासन भिकारी आहे,असे वक्तव्य केले होते. हा तमाम शेतकऱ्यांचा अपमान आहे. शिवाय विविध योजना रेंगाळल्या असून,खर्च महाराष्ट्र शासन भिकारी झाल्यासारखे वाटत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर स्पष्टीकरण द्यावे,अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे. कृषिमंत्री कोकाटे यांनी म्हटले होते की,शेतकऱ्यां जवळून महाराष्ट्र शासन पीक विम्याचे एक एक रुपया घेते, कारण महाराष्ट्र शासन भिकारी आहे, हा महाराष्ट्रातील तमाम जनतेचा घोर अपमान आहे.याबद्दल आपले मत काय? असा सवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी केला आहे. सावजी म्हणाले की, महाराष्ट्र शासन भिकारी आहे हे कोकाटे यांचे म्हणणे अतिशय खरे आहे असे वाटायला लागते. कारण राज्यात सर्व कास्तकारांना पीक विम्याचे पैसे दिल्या गेले नाहीत. निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणीला पंधराशे रुपये दिलेत व २१०० रुपये देऊ असे, असताना याच पंधराशेतून अनेक लाडक्या बहिणी वंचित ठेवल्या. कारण शासना जवळ पैसा नाही. राज्यामध्ये सत्ता आल्यास शेतकऱ्यांचे सर्व कर्ज माफ करू अशी घोषणा करणाऱ्या सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही. अतिवृष्टी होऊनही कास्तकराला व पुरामुळे घराच्या पडझड झालेल्या रहिवाशांना कोणतीही आर्थिक मदत मिळाली नाही तसेच घरकुलाचे अनुदान पूर्णपणे वाटप झाले नाही. घरकुले अर्धेच राहिलेले आहेत. अशा अनेक योजना सुरू होऊन अर्धवट आहे.त्या पूर्ण करण्याकरता पैसा नाही. हे सर्व पाहता शासन भिकारी आहे,असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले हे खरे वाटू लागले आहे. कृषीमंत्री कोकाटे यांनी शासनाबद्दल जे म्हटले याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित खुलासा करावा अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# बुलडाणा ए.सी.बीचे कर्मचारी विनोद लोखंडे यांचे दु:खद निधन..



जनसंचलन/बुलडाणा

आपल्या चांगल्या कार्यामुळे अधिकारीच नव्हे तर कर्मचारी व समाजात आगळीवेगळी ओळख निर्माण करून सर्वांची मने जिंकणारे बुलडाणा एसीबी येथे कार्यरत ४० वर्षीय विनोद लोखंडे यांचे उपचारादरम्यान दु:खद निधन झाले आहे.

बुलडाणा एसीबी मध्ये कार्यरत असलेले विनोद लोखंडे हे मूळचे सवता. बुलडाणा येथील रहिवासी होते. सद्या ते बुलडाणा शहरातील हाजी मलंग दर्गाह जवळ राहत होते.२० जुलै रोजी ड्युटी संपवून घराकडे जात असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि ते दुचाकीवरून जिजामाता कॉलेज जवळ खाली पडले होते.त्यांना तात्काळ शहरातील डॉ. लद्धड यांच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना आज २४ जुलै रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्यांचे निधन झाले आहे.ही वार्ता पसरताच बुलडाणा जिल्हा पोलीस दलात व त्यांच्या चाहत्या वर्गात दुखाचा डोंगर कोसळला आहे.

# अतिवृष्टीचे अग्रीम सानूग्रह अनुदान देऊन सरसगट नुकसान भरपाई द्या नसतात तीव्र आंदोलन छेडू - प्रा.डॉ. गोपाल बच्छिरे

जनसंचलन/ लोणार

लोणार तालुक्यातील अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यास पश्चिम महाराष्ट्र प्रमाणे सरसकट अग्रीम सानूग्रह अनुदान मंजूर करून, युद्ध पातळीवर शेती व घरांच्या पडझडीचे पंचनामे करून संपूर्ण नुकसान भरपाई द्या नसता शिवसेना उ.बा.ठा. पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडू असा इशारा जिल्हा संघटक प्रो.डॉ.गोपाल बच्छिरे यांनी लोणार तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व कृषी मंत्री यांना दिला. लोणार तालुक्यातील पांगरा डोळे, हिरडव, सुलतानपूर, बीबी व लोणार शहर परिसरातील पाचही मंडळात सोमवार २१ जुलै रात्री ढगफुटी होऊन हजारो शेतकऱ्यांच्या शेतातील बंधारे फुटून उभे पीक असलेल्या हजारो हेक्टर शेतीतील माती खरडून वाहून गेलेली आहे कित्येक शेतकऱ्यांच्या घराची पडझड होऊन त्यांचे संसार उघड्यावर आले आहे हे सर्व आम्ही स्वतः संपूर्ण अतिवृष्टी ग्रस्त गावांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू बघितले आहे, यापूर्वीही दोनदा अतिवृष्टी झालेली आहे शासन प्रशासनाने फक्त पंचनामे करण्याचे ढोंग करून कोणतीही नुकसान भरपाई न देता वेळ मारून नेलेली आहे, म्हणून पश्चिम महाराष्ट्र प्रमाणे अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट अग्रीम सानूग्रह अनुदान मंजूर करावे व युद्ध पातळीवर पडझड झालेल्या घरांचे व शेतीचे पंचनामे करून त्यांना त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी, त्याचबरोबर टिटवी, देऊळगाव कुंडपाळ व गुन्धा येथील लघु पाटबंधारे प्रकल्प हे शंभर टक्के भरले आहे त्यातील देऊळगाव कुंडपाळ येथील प्रकल्पाच्या भिंतीला भगदाड पडले आहे वेळीच उपाययोजना करावी नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शासन व प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा जिल्हा संघटक प्रो.डॉ.गोपाल बच्छिरे यांनी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व विधानभवनात कामकाजाच्या वेळी रमी खेळणारे कृषी मंत्री यांना देण्यात आले आहे



याप्रसंगी शहर प्रमुख गजानन जाधव, महिला तालुकासंघटिका तारामती जायभाये, महिला शहरसंघटिका शालिनीताई मोरे, उपसरपंच रवींद्र सुटे, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, शहर संघटक तानाजी मापारी,ज्येष्ठ शिवसैनिक पांडुरंग घोडके, प्रकाश सानप, श्याम राऊत, सुदन अंभोरे, युवा शहराधिकारी श्रीकांत मादनकर, युवा तालुका उपाधिकारी अमोल सुट्टे, विभाग प्रमुख तानाजी अंभोरे, ज्ञानेश्वर दुधमोगरे, विजय घोडके, मंगेश मोरे, विलास कालापाड, गोपाल मापारी, संजय सुभेदार, अल्पसंख्यांक चे अशफाक खान, फहीम खान, अभिजीत जाधव, छत्रभुज फोलाने, गजानन चाटे, उमेश मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते..

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८